08 APR 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# कुशलतेने उभारल्या ६० कोटींच्या १५ इमारती

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कालावधीत सुसज्ज इमारती : वाढत्या अभ्यासक्रमानुसार प्राथमिक सोयी-सुविधा उपलब्ध

अहिल्या परकाळे
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठांतर्गत शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. त्यानुसार विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांमध्येही वाढ होत असल्याने त्यांना प्राथमिक सोयी-सुविधा मिळवून देणे ही विद्यापीठ प्रशासनाची गरज आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या कालावधीत त्यांनी १५ सुसज्ज इमारती उभारल्या आहेत. ६० वर्षांपासून सुरू असलेल्या अभ्यासक्रमांना स्वतंत्र इमारती मिळाल्या आहेत. त्यामुळे कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांच्यानंतर कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या कुशल नेतृत्वामुळेच ६० कोटी खर्च करून या इमारती उभारून विद्यार्थ्यांना लागणाऱ्या सुविधा उपलब्ध केल्याने विद्यार्थिनींच्या संख्येत वाढ होत आहे.

विद्यापीठाची दिवसेंदिवस शैक्षणिक प्रगती होत आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार अभ्यासक्रमांची संख्या वाढत आहे. त्यानुसार या अभ्यासक्रमांचे शिक्षण घेणाऱ्यांचा आकडादेखील वाढल्याने प्राथमिक सोयी-सुविधा देणे गरजेचे आहे. जवळपास २० पेक्षा जास्त अध्यासन, एक स्टार्टअप, १० पेक्षा जास्त वसतिगृहे बांधली आहेत. शासनासह स्वनिधी आणि लोकस्मृती वर्गणीतूनही वसतिगृह, वाचनालयाची उभारणी केली जात आहे. निवास, भोजनाची सोय होत असल्याने विद्यार्थिनींची संख्या वाढली आहे. अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर एम.फिल., पीएच.डी. करणाऱ्यांच्या संख्येत वाढ होत आहे. त्यामुळे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आपल्या संकल्पनेतून लोकस्मृती वसतिगृह उभारण्यास प्रारंभ केला आहे. याला दानशूरांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. शासनाकडून जास्तीत जास्त निधी मिळवण्याचा कुलगुरू डॉ. शिर्के प्रयत्नशील आहेत. विद्यापीठ फंडातील करोडो रुपयांचा निधी इमारतींसाठी खर्च केला जात आहे. परिणामी प्रत्येक विषयाला स्वतंत्र इमारत मिळाली आहे. शिक्षणासह विद्यार्थी संशोधनही इथेच करू शकतात, केलेल्या संशोधनाचे स्टार्टअपतून व्यवसाय सुरू करण्यासही प्रशासन विद्यार्थ्यांना मदत करत आहे.

तरुण भारत
विद्यापीठातून

### इमारती व रक्कम

- प्राणीशास्त्र विभागांतर्गत सेंटर ऑफ एक्सलन्स अँड इनक्युबेशन सेलिकल्चर : ८१ लाख १८ हजार रुपये
- सायबर सिक्युरिटी विभाग इमारत विस्तारीकरण : १ कोटी ८७ लाख ७६ हजार रुपये
- अस्मिता-संशोधन विद्यार्थिनी वसतिगृह : ६८ लाख ९५ हजार रुपये
- कुस्ती संकुल : १ कोटी ५१ लाख १८ हजार रुपये
- अँड स्वाती पणदूरकर स्मृती अभ्यासिका : ५८ लाख ८ हजार रुपये
- पुर्व व पश्चिम भागास जोडण्याकीरता भुयारी मार्ग : ८ कोटी ४८ हजार ८२ रुपये
- यशवंतराव चव्हाण स्कुल ऑफ रूरल डेव्हलपमेंटची इमारत : १ कोटी रुपये
- वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागासाठी इमारत : ६ कोटी ३८ लाख ५८ हजार रुपये
- क्रीडा विभागाचे वसतिगृह : ५ कोटी ३७ लाख २७ हजार रुपये
- विद्यार्थी कल्याण विभागासाठी वसतिगृह : २ कोटी ५२ लाख १३ हजार रुपये
- होलिस्टीक डेव्हलपमेंट ऑफ स्टुडंटस् अँड डिजिटल स्टुडीओ, डाटा सेंटर आणि डिझास्टर रिकव्हरी केंद्र : ७ कोटी ४७ लाख रुपये
- लोकस्मृती वसतिगृह : १ कोटी ८३ लाख ३० हजार
- भुगोलशास्त्र विभाग विस्तारीकरण : १ कोटी ३८ लाख ९६ हजार रुपये
- संख्याशास्त्र अधिविभागासाठी सेमिनार हॉल : १ कोटी ५२ लाख ४६ हजार रुपये

### अनेक अभ्यासक्रमांना मिळाल्या स्वतंत्र इमारती

गेल्या साठ वर्षापुर्वी सुरू असलेल्या अनेक अभ्यासक्रमांना स्वतंत्र इमारती नव्हत्या. विद्यापीठाचे खेळाडू, कलाकार आणि परदेशी विद्यार्थ्यांना विद्यापीठात राहण्याची सोय नव्हती. ही अडचण लक्षात घेवून वसतिगृह बांधली आहेत. त्यामुळे विद्यार्थ्यांची सोय झालीच पण अभ्यासक्रमांनाही स्वतंत्र इमारती मिळाल्याने प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण आहे.

### शैक्षणिक, प्रशासकीय कामाला वेग

कुलगुरू डॉ. शिर्के गेल्या ४० वर्षापासून विद्यापीठात कार्यरत असल्याने त्यांनी विविध अधिकार मंडळावर काम केले आहे. ज्या विद्यापीठात विद्यार्थी त्याच विद्यापीठात प्राध्यापक आणि विविध अधिकार मंडळ, प्र-कुलगुरूसह कुलगुरू म्हणून रूजू झाले. त्यामुळे विद्यापीठातील प्रत्येक प्रश्नाची त्यांना जाण आहे. त्यावरील उपाययोजनांची माहिती आहे. त्यामुळे त्यांनी नियमांच्या अधिन राहून शैक्षणिकसह प्रशासकीय कामाला वेग दिला आहे. त्यांनी विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला आहे.

### नाविन्यपूर्ण गोष्टी केल्याचा आनंद

कुलगुरूपदाचा कार्यभार स्विकारल्यानंतर ज्या विभागांसाठी स्वतंत्र इमारत व सुविधा नाही, अशा विभागांना इमारत व सुविधा उपलब्ध करून दिल्या. कुलगुरू असल्याने काही नाविन्यपूर्ण गोष्टी करता आल्या, यातून विद्यार्थ्यांना न्याय मिळाला, याचा आनंद आहे.

-डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2025
लोकमत

# रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे उद्या वितरण : भवाळकर यांचा सन्मान

## मारुतीराव जाधव, समीर चव्हाण यांचाही गौरव


लोकमत न्यूज नेटवर्क



तारा भवाळकर

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यक, ९८ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांना उद्या बुधवारी प्रदान करण्यात येणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी सोमवारी पत्रकार परिषदेत दिली.

बुधवारी दुपारी ४ वाजता ज्येष्ठ साहित्यिक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात या पुरस्काराचे वितरण होईल.



मारुतीराव जाधव



समीर चव्हाण

तर विद्यापीठाचा पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार स्व. मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांना तर सद्गुरू डॉ.गुरुनाथ मंगळे पुरस्कार आयआयटी कानपूर येथील प्रा. समीर चव्हाण यांना याच दिवशी सकाळी ११ वाजता डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे अशी माहिती कुलगुरू शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

यावेळी प्र. कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, डॉ. नंदकुमार मोरे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2025

सकाळ

# विद्यापीठात उद्या डी. वाय. पाटील, डॉ. मुंगळे, कणबरकर पुरस्कारांचे वितरण



कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाचा सद्‌गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे पुरस्कार, पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार आणि प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे वितरण बुधवारी (ता. ९) होणार आहे. त्यात ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर, प्रा. समीर चव्हाण यांना, तर दिवंगत मारुती जाधव (तळाशीकर गुरुजी) यांच्या कुटुंबीयांना पुरस्कार प्रदान केला जाणार असल्याची माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी आज येथे पत्रकार परिषदेत दिली.

संत साहित्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या अभ्यासकांसाठी गेल्या वर्षीपासून विद्यापीठाने 'पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार' सुरू केला. पहिला पुरस्कार तळाशी (ता. राधानगरी) येथील मारुतीराव जाधव यांना सप्टेंबरमध्ये जाहीर करण्यात आला. मात्र, जाधव यांचे त्या महिन्यात निधन झाल्याने या पुरस्काराचे वितरण पुढे ढकलले. आता संबंधित पुरस्कार जाधव कुटुंबीयांना बुधवारी सकाळी अकरा वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत प्रा. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान केला जाईल. यावेळी संत साहित्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या आयआयटी कानपूरमधील प्रा. चव्हाण यांना सद्‌गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे. दुपारी चार वाजता डॉ. भवाळकर यांना प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्काराने गौरविण्यात येणार असल्याचे कुलगुरू डॉ. शिर्के यांनी सांगितले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, परीक्षा मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, सुहासिनी पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, बी. ए. खोत आदी उपस्थित होते.

08 APR 2025


तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे उद्या वितरण

## कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांची माहिती: ज्येष्ठ विचारवंत डॉ.सदानंद मोरे यांच्या हस्ते वितरण


तारा भवाळकर


स्व. मारुतीराव जाधव


प्रा. समीर चव्हाण

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ लोकसाहित्याच्या अभ्यासक आणि अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षा डॉ. तारा भवाळकर यांना तर 'पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील' पहिला पुरस्कार तळाशी (ता. राधानगरी) येथील मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांना आणि संत 'सदगुरु डॉ. गुरुनाथ मुंगळे अध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य' पहिला पुरस्कार कानपूर येथील आयआयटीचे प्रा.समीर. चव्हाण यांना देवून सन्मान करण्यात येणार आहे. पुरस्कार वितरण सोहळा उद्या (दि. ९) रोजी ज्येष्ठ विचारवंत व संत साहित्याचे अभ्यासक डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते होणार आहे, अशी माहिती आयोजित पत्रकार परिषदेत कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के यांनी दिली.

कुलगुरु डॉ. शिर्के म्हणाले, रा. कृ. कणबरकर पुरस्कार वितरण उद्या दुपारी ४ वाजता राजर्षी शाहू सभागृहात होणार आहे. १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतीचिन्ह व मानपत्र असे या पुरस्कारचे स्वरुप आहे. तर विद्यापीठाचा पहिला पद्मश्री डॉ.डी.वाय. पाटील पुरस्कार स्व.मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांना तर सदगुरु डॉ.गुरुनाथ मंगळे पुरस्कार आयआयटी कानपूर येथील प्रा. समीर चव्हाण यांना याच दिवशी सकाळी ११ वाजता डॉ. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान करण्यात येणार आहे. पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पहिलाच पुरस्कार २३ सप्टेंबर २०२४ मध्ये तळाशीकर गुरुजी यांना जाहीर करण्यात आला. मात्र, २९ सप्टेंबरला त्यांचे निधन झाल्याने या पुरस्काराचे वितरण करण्यात आले नव्हते.

सोलापूर येथील डॉ. गौरी कहाते यांनी त्यांचे वडील स्व.डॉ.गुरुनाथ मुंगळे यांच्या स्मृतीप्रीत्यर्थ विद्यापीठास दिलेल्या देणगीतून ग्रंथकार व ग्रंथासाठी सदगुरु डॉ. गुरुनाथ मुंगळे अध्यात्मिक तत्वज्ञान साहित्य पुरस्कार विद्यापीठाने सुरु केला.

यावेळी प्र–कुलगुरु डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ.व्ही.एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुहासिनी पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. रा. कृ. कणबरकर पुरस्कार समितीचे सदस्य प्राचार्य डॉ. बी. ए. खोत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्राचे संचालक डॉ. श्रीकृष्ण महाजन, उपकुलसचिव डॉ. वैभव ढेरे, जनसंपर्क अधिकारी डॉ. आलोक जत्राटकर प्रमुख उपस्थित होते.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
08 APR 2025

पुण्यनगरी

# पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्काराचे उद्या वितरण

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे २०२४ साठीचा पहिला पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार तळाशी, ता. राधानगरी येथील मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांना दि. २३ सप्टेंबर २०२४ रोजी जाहीर करण्यात आला. तथापि, त्यांचे दि. २९ सप्टेंबर रोजी निधन झाले. त्यामुळे हा पुरस्कार दि. ९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत प्रा. सदानंद मोरे यांच्या हस्ते त्यांच्या कुटुंबीयांना प्रदान करण्यात येणार आहे.

पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील यांच्या कुटुंबीयांनी शिवाजी विद्यापीठाला दिलेल्या देणगीतून हा पुरस्कार सुरू केला आहे. हा पुरस्कार दोन वर्षांतून एकदा संत साहित्यामध्ये जीवनभर ध्यासपूर्वक काम करणाऱ्या ज्येष्ठ अभ्यासकाला देण्यात येणार आहे. पुरस्काराचे स्वरूप रोख रुपये एक लाख, सन्मानचिन्ह, मानपत्र, शाल आणि श्रीफळ असे आहे. मारुतीराव जाधव यांनी तळाशीसारख्या दुर्गम आणि शेतकरी कुटुंबात राहून संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संत साहित्याचा अभ्यास केला.



मारुतीराव जाधव

जनसंपर्क कक्ष
0 8 APR 2025
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार मारुतीराव जाधव यांना जाहीर

## सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे पुरस्काराचे प्रा. समीर चव्हाण मानकरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

संत साहित्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या अभ्यासकांसाठी यावर्षी शिवाजी विद्यापीठाने सुरू केलेला २०२४ चा पहिला पुरस्कार पद्मश्री डॉ. डी. वाय. पाटील पुरस्कार तळाशी (ता. राधानगरी) येथील मारुतीराव जाधव (तळाशीकर गुरुजी) यांना जाहीर झाला आहे. संत साहित्यामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या ग्रंथकार, ग्रंथासाठीचा सद्गुरू डॉ.गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार आय.आय.टी कानपूर (उत्तर प्रदेश) येथील प्रा. समीर चव्हाण यांना देण्यात येणार आहे. पुरस्कार प्रदान समारंभ ९ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात ज्येष्ठ विचारवंत प्रा. सदानंद मोरे यांच्या हस्ते प्रदान



मारुतीराव जाधव



प्रा. समीर चव्हाण

करण्यात येणार आहे, अशी माहिती कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी पत्रकार परिषदेत दिली.

डॉ. डी. वाय. पाटील यांच्या कुटुंबीयांनी विद्यापीठास दिलेल्या देणगीतून हा पुरस्कार सुरू केला आहे. मारुतीराव जाधव यांनी राधानगरी तालुक्यातील तळाशीसारख्या दुर्गम व शेतकरी कुटुंबात राहून ध्यासपूर्वक संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम आणि इतर संतांच्या साहित्याचा अभ्यास केला.

सद्गुरू डॉ. गुरुनाथ मुंगळे आध्यात्मिक तत्त्वज्ञान साहित्य पुरस्कार प्रा. चव्हाण यांना जाहीर झाला आहे.

### रा. कृ. कणबरकर पुरस्काराचे उद्या वितरण

विद्यापीठाच्या वतीने देण्यात येणारा प्राचार्य रा. कृ. कणबरकर पुरस्कार ज्येष्ठ साहित्यिक डॉ. तारा भवाळकर यांना बुधवारी प्रदान करण्यात येणार आहे. राजर्षी शाहू सभागृहात दुपारी ४ वाजता होणाऱ्या कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक डॉ.सदानंद मोरे यांच्या हस्ते पुरस्काराचे वितरण होईल. १ लाख ५१ हजार रुपयांचा धनादेश, स्मृतिचिन्ह व मानपत्र असे या पुरस्कारचे स्वरुप आहे.

जनसंपर्क कक्ष
0 8 APR 2025
पुढारी शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पुरोगामी विचारांचा वारसा पत्रकारितेने मांडत राहणे महत्त्वाचे : डॉ. राधेश्याम जाधव

## 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' पुस्तकाचे विद्यापीठात प्रकाशन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पत्रकारितेच्या क्षेत्राने शिव, शाहू, फुले, आंबेडकर यांनी प्रदान केलेल्या पुरोगामी विचार मूल्यांच्या चौकटीचा वारसा पुन्हापुन्हा अधोरेखित करीत राहून त्याची नव्याने मांडणी करीत राहिले पाहिजे, असे प्रतिपादन 'दि हिंदू' दैनिकाचे सिनिअर डेप्युटी एडिटर डॉ. राधेश्याम जाधव यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या एम. ए. मास कम्युनिकेशन विभागाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांच्या 'शाहूपूर्व व शाहूकालीन वर्तमानपत्रे' या पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात ते 'शाहूकालीन पत्रकारितेची मूल्यमिमांसा' या विषयावर बोलत होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते.

डॉ. राधेश्याम जाधव म्हणाले, छत्रपती शिवाजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा लढा हा सामाजिक न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांच्या प्रस्थापनेसाठी होता. या मूल्यांच्या प्रस्थापनेचा वसा घेऊन सत्यशोधक चळवळीतील वर्तमानपत्रे कार्यरत झाली. राजर्षी शाहू महाराज हे वेदोक्त प्रकरणाकडे मूल्यांसाठीचा लढा याच दृष्टिकोनातून पाहात होते. या मूल्यांतूनच नैतिकता उभी राहते. याच मूल्यचौकटीचा वारसा आजच्या पत्रकारितेनेही पुढे न्यायला हवा.




**कोल्हापूर : डॉ. शिवाजी जाधव लिखित 'शाहूपूर्व व शाहूकालीन पत्रकारिता' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी बोलताना वरिष्ठ पत्रकार-संपादक डॉ. राधेश्याम जाधव. मंचावर डॉ. शिवाजी जाधव, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. (छाया : नाज ट्रेनर)**

डॉ. जयप्रकाश पाटील यांनी स्वागत केले. डॉ. शिवाजी जाधव यांनी प्रास्ताविक केले. प्रवीण पाढरे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सुमेधा साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, ज्येष्ठ विचारवंत डॉ. अशोक चौसाळकर, डॉ. सुनीलकुमार लवटे, डॉ. जे. के. पवार, इंद्रजित सावंत, डॉ. रणधीर शिंदे, डॉ. अक्षय सरवदे, डॉ. नंदकुमार मोरे, डॉ. अवनीश पाटील, डॉ. विनोद ठाकूरदेसाई, वसंतराव मुळीक आदी उपस्थित होते.